# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.09.2025** **वार- शनिवार**

---

**<u>बीएसएनएल</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आत्मनिर्भर भारत योजनेंतर्गत संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या '4G' तंत्रज्ञानाधारित सेवेचं लोकार्पण ओडिशातील झारसुगुडा इथून दूरस्थ पद्धतीनं आज करण्यात आलं. याअंतर्गत बीएसएनएलच्या 92 हजार 633 टॉवर्सचं लोकार्पण झालं असून, यापैकी 9 हजार 20 टॉवर्स महाराष्ट्रात उभारले गेले आहेत. या माध्यमातून महाराष्ट्र शासनाच्या अकराशे ऑनलाईन सेवा गावागावात पोहोचण्यात लाभ होणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यामध्ये यानिमित्त झालेल्या राज्यस्तरीय कार्यक्रमात बोलताना सांगितलं. स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित 4जी सेवा विकसित करणारा भारत जगातला पाचवा देश ठरला आहे.

**<u>सूर्यघर</u>**

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून सौर प्रकल्प उभारण्याचा पर्याय 18 हजार 694 पुणेकरांनी पसंत केला आहे. या योजनेतून त्यांना 151 कोटी रुपयांचं अनुदान देखील मिळालं असून, 90 मेगावॅटपेक्षा जास्त वीजनिर्मिती होत आहे, अशी माहिती महावितरणचे पुणे परिमंडलचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी दिली. महाराष्ट्रात 2 लाख 91 हजार 811 घरांवर असे प्रकल्प साकारले असून, त्याची क्षमता 1 हजार 100 मेगावॅटवर पोहोचली आहे. सौर पत्रे बसविण्याची इच्छा आहे; परंतु आर्थिक अडचणींमुळं शक्य होत नाही अशांसाठी केंद्रानं 'जनसमर्थ' पोर्टल विकसित केले आहे. राष्ट्रीय बँका या पोर्टलद्वारे 90 टक्के कर्ज उपलब्ध करुन देतात, त्याचा व्याजदर गृहकर्जापेक्षाही कमी असल्याचं काकडे यांनी सांगितलं.

**<u>नुकसान</u>**

राज्यात अतिवृष्टीमुळं आतापर्यंत सुमारे 92 लाख एकरवरील पिकांचं नुकसान झालं असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज पुण्यात पत्रकारांना दिली. एकट्या सप्टेंबर महिन्यातच 53 लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर नुकसान झालं आहे. नुकसानापोटी आत्तापर्यंत बाधित शेतकऱ्यांना 2 हजार 250 कोटी रुपयांची मदत बँक खात्यावर जमा करण्यात आल्याचं भरणे यांनी सांगितलं. महसूल आणि कृषी विभागाकडून संयुक्तपणे पंचनामे करण्याचं काम सुरू असून, क्षेत्रीय स्तरावरून नुकसानाचा अहवाल प्राप्त होताच पुढील आर्थिक मदत केली जाईल, असंही ते म्हणाले.

**<u>दूध फरक</u>**

कात्रज डेअरी अर्थात पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाकडून शेतकऱ्यांना दोन रुपये दूधफरक जाहीर करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 66 व्या वार्षिक सर्वसाधारण

सभेत हा निर्णय घेण्यात आला. संस्था प्रतिनिधींनी मांडलेल्या मागणीनुसार हा दर फरक देण्याची घोषणा संचालक मंडळाकडून करण्यात आली.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महापालिकेनं शहरातील प्रमुख रस्त्यांच्या दुभाजकांवर तसंच पदपथांवर दर दहा मीटर अंतरावर देशी प्रजातींच्या झाडांची लागवड करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. झाडं लावताना दोन झाडांच्या मध्ये नियमापेक्षा जास्त जागा ठेवू नये, झाडांची कापणी एका रेषेत करावी, झाडांभोवती प्लास्टिक वा कचरा दिसणार नाही याची काळजी घ्यावी, संरक्षक बांबू ट्री गार्ड लावावे, झाडांना नियमित पाणी द्यावे, अशा सूचना उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

**महिला**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत महिला व बालकल्याण योजना अंतर्गत मौजे आकुर्डी इथल्या खाद्यपदार्थ केंद्रातील 49 गाळे महिला बचत गटांना भाडेकरारानं देण्यासाठी ई-लिलावाचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी उद्यापर्यंत अर्ज करण्याची मुदत आहे.  नोंदणीकृत महिला बचत गटांसाठी विविध श्रेणींखाली 40 गाळ्यांचं आरक्षण असेल.

**खासदार**

पुणेकरांचे प्रश्न, समस्या आणि नवकल्पना थेट ऐकून त्यावर तोडगा काढण्यासाठी खासदार मुरलीधर मोहोळ यांनी सुरू केलेल्या ‘खासदार जनसंपर्क सेवा अभियानाचा दुसरा टप्पा पर्वती विधानसभा मतदारसंघात आयोजित करण्यात आला आहे. हा जनता दरबार उद्या सकाळी 10 वाजता सिंहगड रस्त्यावरील कल्पना चावला इंग्रजी माध्यम शाळेत होणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने यात सहभागी व्हावं, असं आवाहन खासदार मोहोळ यांनी केलं आहे.

**वारकरी**

वारकरी परंपरेला आणि संस्कृतीला अभिवादन म्हणून महाराष्ट्रात प्रथमच खेळ रंगला वारकर्यांचा’ हा अभिनव आणि भक्तिमय उपक्रम पुण्यात साजरा करण्यात येत आहे. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो वारकरी, कीर्तनकार आणि प्रवचनकार मोठ्या संख्येने सहभागी होणार असून हा उपक्रम वारकऱ्यांसाठी मोफत आहे अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते मिलिंद वाळंज, यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. वारकरी परंपरेतील पारंपरिक खेळ, विरंगुळा, आनंद मेळावा आणि अभंग गायन या मेळाव्यात होणार आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**